Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit ... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २८४ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२३ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### मराठा आंदोलनामागे वेगळे काही आहे का?

**मुंबई–**मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सरकार सकारात्मक आहे. त्यामुळे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला वेळ द्यायला हवा, असे मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. आतापर्यंतची आकडेवारी पाहता, मराठा बांधवांना ८०% आरक्षण मिळाले असल्याचा दावा देखील त्यांनी केला. तर आता केवळ २०% साठी सरकारला थोडीही उसंत मिळू नये म्हणून हा प्रयत्न सुरू आहे का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. या माध्यमातून मुंडे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या मागे वेगळे काही आहे का? याची शंका ही आमच्या मनात उपस्थित होत असल्याचेही मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.मराठा आरक्षणासाठी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटीमध्ये येथे मराठा आरक्षक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषण सुरु केले आहे. तसेच ७ ऑगस्टपासून ते पश्चिम महाराष्ट्रात शांतता रॅली काढणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे. यावर धनंजय मुंडे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मराठा आरक्षणाबाबत सरकार सकारात्मक आहे. मराठा बांधवांना ८०% आरक्षण मिळालेले आहे. आता २०% साठी सरकारला थोडीही उसंत मिळू नये म्हणून हा प्रयत्न सुरू आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत

**मुंबई–**ख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिलासा देणारा मोठा निर्णय घेतला आहे. २०२४ -२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणीही दूर होतील, असा दावा देखील राज्य सरकारच्या वतीने करण्यात आला आहे.राज्यात सध्या आरक्षणासंदर्भातील आंदोलन सुरू असल्याचे राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. मराठा कुणबी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्रास होत असून काही अधिकारी विद्यार्थ्यांना त्रास देत असल्याचा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला होता. या संदर्भात काही विद्यार्थ्यांनी लाडकी बहीण योजनेमुळे देखील प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अडचणी येत असल्याचे सांगितले होते. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थांना मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे आता जात वैधता प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची अडणवूक थांबणार आहे.

### मुख्यमंत्र्यांची आता लाडका बिल्डर योजना

**मुंबई–**गृहप्रकल्प न राबविलेल्या चड्ढा नामक खासगी विकासकाला पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली शासनाने बिनव्याजी ४०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यामुळे आता मुख्यमंत्री लाडका कंत्राटदार नंतर मुख्यमंत्री लाडका बिल्डर योजना महाराष्ट्रात येणार आहे का? असा संतप्त सवाल करत विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल केली आहे.विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या प्रचितगड या शासकीय निवासस्थानी सोमवारी पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यात विजय वडेट्टीवार यांनी सरकारच्या कथित भ्रष्ट कारभाराची पोलखोल केली. ते म्हणाले की, महायुती सरकारने सरकारची तिजोरी खासगी बिल्डरसाठी खुली ठेवली आहे. हा महाराष्ट्राच्या तिजोरीवर जाता-जाता घातलेला दरोडा आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना हा निर्णय मान्य आहे का? हा देखील प्रश्न आहे.मे. चड्ढा डेव्हलपर्स आणि प्रमोटर या दिल्लीस्थित कंपनीवर सरकारने ही मेहेरनजर दाखवली आहे. २०२१ मध्ये या विकासकाशी म्हाडाने करार केला. मात्र आतापर्यंत एकाही घराचा ताबा लाभार्थींना दिला नाही.

## मुख्यमंत्र्यांचा विद्यार्थ्यांना दिलासा देणारा मोठा निर्णय

# जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत



**मुंबई (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिलासा देणारा मोठा निर्णय घेतला आहे. २०२४ -२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणीही दूर होतील, असा दावा देखील राज्य सरकारच्या वतीने करण्यात आला आहे.**

राज्यात सध्या आरक्षणासंदर्भातील आंदोलन सुरू असल्याचे राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. मराठा कुणबी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्रास होत असून काही अधिकारी विद्यार्थ्यांना त्रास देत असल्याचा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला होता. या संदर्भात काही विद्यार्थ्यांनी लाडकी बहीण योजनेमुळे देखील प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अडचणी येत असल्याचे सांगितले होते. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थांना मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे आता जात वैधता प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची अडणवूक थांबणार आहे.अर्थसंकल्पात समाविष्ट आणि महत्वाकांक्षी म्हणून जाहीर केलेल्या सात विविध योजनांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला होता. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना (महिला व बालविकास), मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना (कौशल्य विकास), मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना (अन्न व नागरी पुरवठा), मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना ( उच्च व तंत्र शिक्षण), मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना (सामाजिक न्याय), मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना (ऊर्जा) आणि मुख्यमंत्री वयोश्री योजना (सामाजिक न्याय) या योजनांचा यावेळी तपशीलवार आढावा घेण्यात आला. या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रभावी कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

# अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

## चिमूर प्रकल्प कार्यालयाचे अर्ज करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमुर या कार्यालयाच्या अतंर्गत चिमुर, ब्रम्हपरी, नागभीड, वरोरा व भद्रावती या तालुक्यांचा समावेश होतो. आदिवासी विकास विभागाकडून राज्यातील अनुसुचित जमातीच्या आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यासाठी ७ मार्च २०२४ च्या शासन निर्णयान्वये कुटुंबाचे वार्षिक उत्पनांची कमाल मर्यादा ८ लक्ष रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी क्युएस वर्ल्ड रॅकींग २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी




शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.त्यानुसार परदेशात शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या इच्छुक अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी शासन निर्णयाच्या शर्ती व अटीच्या अधिन राहून अर्ज करावा. अधिक माहितीसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमुर या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे प्रकल्प अधिकारी प्रविण लाटकर यांनी कळविले आहे.

## मूल येथे अडकलेल्या शेकडो प्रवाश्यांची

# राकेश रत्नावार यांनी केली जेवणाची व्यवस्था

**मूल। रोहित कामडे**

मूल तालूक्यात मुसळधार पावसामुळे पुरसदृश्य स्थिती निर्माण होवून अनेक गांवाचा संपर्क तुटला.अनेक प्रवाशाना आपल्या स्वगावी किंवा कामासाठी निघालेल्या नागरीकांना ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणीच थांबावे लागले. मार्ग चालू होईल हया आशेवर सकाळ पासून व्याकुळतेने वाट बघत होते. सततच्या पावसामुळे पाण्यांचा ओघ वाढत जावून कोणताही मार्ग प्रवासा करिता खुला झाला नाही. त्यामूळे, लहाण मुले ,वयोवृध्द,महिला, शेतकरी बंधू उपासीपोटी मूल येथे बस स्थानकावर ताटकळत असल्याचे बाजार समितीचे सभापती राकेश रत्नावार यांचे निदर्शनास आले. त्यांनी सामाजीकतेची जाणीव ठेवून सर्व प्रवाशाना तुमच्या निवासाची व जेवणाची सोय करण्यांत येईल व तुम्हाला कोणतीही अडचण होणार नाही असे आश्वासीत



केले.

राकेश रत्नावार हे नेहमी सामाजीक कार्यात अग्रेसर राहून जेव्हा जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा तेव्हा मदतीला धावून जाण्याचा प्रयत्न करतात. मूल बस स्थानकावर थांबलेल्या नागरीकाना व एस.टी.कर्मचारी यांना तात्काळ जेवनाची सोय उपलब्ध करून दिली. याकरिता बाजार समितीचे उपसभापतीराजेंद्र कन्नमवार,बाजार समितीचे संचालक अमोल बच्चुवार, गुरूदास चौधरी, नरेश बोम्मनवार,आशीष दहिवले, समितीचे कर्मचारी प्रविण चेपुरवार, सहा.सचिव,राजु गेडाम,पर्यवेक्षक,.बबलू सैय्यद, मंगेश खानोरकर,सामाजीक कार्यकर्ते विवेक मुत्यालवार, रूपेश मारकवार, रंजीत आकूलवार, संदिप मोहबे, गौतम जिवने , पठाण ,एस.टी. महामंडळाचे कर्मचारी यांनीसहकार्यकेले.

# जिल्हाधिकाऱ्यांची शेतकरी उत्पादक कंपनीला भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी गिरगाव (ता.नागभीड) येथील चंद्रपूर ग्रो प्रोसेसर्स शेतकरी उत्पादक कंपनीच्या टीपीएच राईस मील उपप्रकल्पाला आणि कृषकोन्नती शेतकरी उत्पादक कंपनीच्या टीपीएच सॉर्टिंग ग्रेडींग उपप्रकल्पाच्या बांधकामाना भेटी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी कंपनीमार्फत सुरु असलेल्या इतर उपक्रमाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कंपनीच्या सुरू असलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त करून उर्वरीत काम त्वरित पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या. तसेच उपस्थित महसूली अधिकारी व विविध विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, वयोश्री योजनांच्या कामकाजास गती देण्याचे निर्देश दिले. तालुक्यात सूरू असलेल्या महसूल, जमाबंदी व



पीकपाहणी या कामकाजाबाबतही जिल्हाधिका- यांनी आढावा घेतला. सद्यस्थितीत निवडणूक आयोगाकडून सूरू असलेल्या मतदारयादीच्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी अचूक करावी, अशा सुचना त्यांनी दिल्या.

यावेळी ब्रम्हपुरीचे उपविभागीय अधिकारी संदिप भस्के, नागभीडचे तहसीलदार प्रताप वाघमारे, स्मार्ट प्रकल्पाचे नोडल अधिकारी नंदकुमार घोडमारे, उपविभागीय कृषी अधिकारी स्वाती घुले, तालुका कृषी अधिकारी शिवकुमार पुजारी, पुरवठा व मूल्य साखळी तज्ज्ञ गणेश मादेवार, मंडळ अधिकारी रंजना ढोले, मंडळ कृषी अधिकारी प्रिया शिंदे, कृषी पर्यवेक्षक, तलाठी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, पोलीस पाटील, कृषी सहाय्यक, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आदी उपस्थित होते.

# वीज दरवाढी विरोधात जय विदर्भ पार्टी आक्रमक




**नागपूर । प्रतिनिधी**

जय विदर्भ पार्टीतर्फे वीज दरवाढी विरोधात आज दि. २२ जुलै २०२४ ला व्हेरायटी चौक, गांधी पुतळ्यासमोर, नागपूर येथे नारे निदर्शने करण्यात आले. वीज विदर्भात तयार होत असून त्याकरीता जमीन, पाणी, कोळसा व इतरही संसाधने विदर्भाची वापरले जाते व प्रदूषणामुळे होणारे टी.बी., कॅन्सर, दमासारख्या दुर्धर आजारांचा सामनासुद्धा विदर्भाच्या जनतेला करावा लागते आणि महागडी वीज सुद्धा खरीदावे लागत आहे. जेव्हा की, विदर्भातील वीज प्रकल्पात सरासरी २ रुपये ५० पैसे दराने वीज तयार केली जाते व त्यावर वहन आकार १ रुपया १७ पैसे प्रती युनिट दराने, इंधन समायोजन आकार ८० पैसे प्रती युनिट, स्थिर आकार १३० रुपये प्रती वीज ग्राहक व वीज शुल्क १६ टक्के दराने लादल्याने वीज बिलात १ एप्रिल २०२४ पासून अतोनात दरवाढ झाली आहे. त्यामागे महावितरण द्वारे सांगण्यात येते कि, ६७,४४४ कोटी रुपयांनी महावितरण तोट्यात असल्याने हि दरवाढ केली आहे परंतु वीज विदर्भात तयार होत आहे व गोवा राज्यापर्यंत वाहून नेल्या जात आहे तर त्याचा वाहन आकार आम्ही विदर्भातील जनतेने का भरावा ? म्हणूनच विदर्भाच्या जनतेला वीज दरवाढ देणे लागत नाही.

आंदोलन स्थळी जय विदर्भ पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अरुण केदार, उपाध्यक्ष मुकेश मासुरकर, सहसचिव गुलाबराव धांडे, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष सुधा पावडे, नागपूर शहर महासचिव नरेश निमजे, नागपूर जिल्हाध्यक्ष श्रीकांत दौलतकर, कार्याध्यक्ष भोजराज सरोदे, दक्षिण नागपूर अध्यक्ष राजेंद्र सतई, उत्तर नागपूर अध्यक्षा ज्योती खांडेकर, मध्य नागपूर अध्यक्ष रवींद्र भामोडे, दक्षिण पश्चिम अध्यक्ष अशोक पाटील, कामठी तालुकाध्यक्ष प्रशांत नखाते, जिल्हाध्यक्ष वाहतूक आघाडी अमूल साकुरे, नागपूर शहर कोषाध्यक्ष रमेश वरुडकर, जिल्हा महासचिव रत्नाकर जगताप, पूर्व नागपूर संघटन मंत्री प्रशांत जयकुमार, विजय मौदेकर, सुहासिनी खडसे, तेजराम रेवतकर, उमेश कळंबे, बाबाराव मस्की, भरत बविस्टाले,राजू काळे, माखन धुर्वे, सतीश शेंद्रे, मधुकर झटाले, प्यारुभाई उर्फ नौशाद हुसैन, युनुस खान, अकिल खान, गंगाधर मुंडकर, रेवाराम बेलेकर, प्रवीण जैन, प्रफुल वांढरे, अरविंद चिंचखेडे, नीलकंठ अंभोरे, लीलाधर कालभूत, रामचंद्र आगाशे, अनिल ढोपरे, विठ्ठलराव मानेकर, लवकुश पटेल, प्रशांत तागडे सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती करीता अर्ज करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इ. १० वी, १२वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी इ. अभ्यासक्रमामंध्ये विद्यार्थ्यांना सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारीने गुण प्राप्त करून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाजातील विद्यार्थ्यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीकरीता अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत २५ जुलै २०२४ आहे.सदर शिष्यवृत्तीकरीता पोटजात असलेले मांग, मातंग, मिनिमादीग, मादींग, दानखनीमांग मागंमहाशी, मदारी, राधेमांग, मांगगारुडी, मांगगारोडी, मादगी, मादीगा या जातीतील विद्यार्थी विद्यार्थीनींना महामंडळाकडून जेष्ठता व गुण क्रमांकानुसार जिल्ह्यातील प्रथम ३ ते ५विद्यार्थ्यांस उपलब्ध निधीच्या अधिन राहून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.अर्ज भरण्याकरीता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चंद्रपूर येथे संपर्क करून मुळ कागदपत्रे दोन प्रतीत आणावीत किंवा चंद्रपूर जिल्हा कार्यालयाच्या slasdcchandrapurgmail.com या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा, असे जिल्हा व्यवस्थापकांनी कळविले आहे.आवश्यक कागदपत्रे : जातीचा दाखला, फोटो, मार्कशीट, शाळा सोडल्याचा दाखला, राशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकेट व जिल्हा व्यवस्थापकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज.

# नुकसानीचे पंचनामे करून अहवाल तात्काळ सादर करा;अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांचे निर्देश

**अहेरी | प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात मागील तीन ते चार दिवसापासून मुसळधार पावसामुळे अतिवृष्टी निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे दक्षिण भागातील अहेरी, सिरोंचा, भामरागड आणि एटापल्ली तालुक्यात झालेल्या पूर परिस्थितीमुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत देण्यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून प्रत्येक घरापर्यंत जाऊन तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून तत्काळ अहवाल द्या असे स्पष्ट निर्देश अहेरीचे अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी दिले आहे.

अहेरी, सिरोंचा, भामरागड आणि एटापल्ली ही चार तालुके अहेरी अपर जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत येत असून त्यांनी सर्व विभाग प्रमुखांची सोमवारी (२२ जुलै) रोजी स्थानिक तहसील कार्यालयात आढावा सभा स्पष्ट निर्देश दिले आहे.

या आढावा सभेला तहसीलदार बालाजी सोमवंशी,गटविकास अधिकारी राहुल वरठे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता बळवंत रामटेके,तालुका आरोग्य अधिकारी डॉ किरण वानखेडे,मुख्याधिकारी एन सी दाते, सार्वजनिक बांधकाम विभागा आलापल्लीचे उपअभियंता रविकिरण पारेलवार, राष्ट्रीय महामार्गाचे उप अभियंता सारंग गोगटे,सार्वजनिक बांधकाम विभाग आलापल्लीचे अभियंता अतुल ढोले, राष्ट्रीय महामार्गाचे सिरोंचाचे अभियंता वैभव वैद्य,एच ए साळुंके,कृषी विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तात्काळ माहिती सादर करणे,प्रत्येकाच्या घरी जाऊन मोका पंचनामा करणे,पूर ओसरल्यावर रोगराई पसरू नये यासाठी तात्काळ उपाययोजना करण्यात यावे,शेतीचे झालेल्या नुकसान बाबत तात्काळ माहिती देणे,जल स्रोत शुद्ध करणे,रोगराई पसरल्यास रुग्णांना तात्काळ दाखल करणे, गरोदर मातांची योग्य काळजी घेणे तसेच सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे देखील सक्तीचे केले आहे.जे अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी राहणार नाही त्यांच्यावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियमा अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल



असेही त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.चारही तालुक्यातील नुकसंग्रस्तांना शासनाकडून तात्काळ मदत देण्याच्या अनुषंगाने सर्व विभागांच्या समन्वयातून सहकार्य करण्याचे आवाहन करतानाच सर्वसामान्यांची कुठलीही तक्रार येणार नाही याची खबरदारी घेऊन सर्व यंत्रणेने सज्ज राहून काम करा असे अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी स्पष्ट सूचना दिले.तर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी व्हीसी द्वारे आवश्यक माहिती तात्काळ सादर करण्याचे निर्देश दिले.प्रत्येक विभागाला स्वतंत्र फॉरमॅट मध्ये माहिती त्यांनी मागितली आहे.तर सर्व यंत्रणांनी सज्ज राहून दिलेल्या कालावधीत उपाययोजना करण्यासाठी त्यांनी डेडलाईन दिली आहे.

### रस्ते विकासाबाबत ॲक्शन प्लॅन तयार करा

**अहेरी उपविभागात रस्त्यांची फार दयनीय अवस्था झाली असून राष्ट्रीय महामार्गासह,राज्य मार्गाची देखील वाट लागली आहे.पावसामुळे तात्पुरत्या सवरूपात तयार केलेले वळण मार्ग वाहून गेल्याने रहदारी ठप्प झाली आहे.या सर्व रस्त्यांची व पुलांची यंत्रणानिहाय माहिती योग्य प्रपत्रात सादर करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.नागरिकांची अडचण लक्षात घेता राष्ट्रीय महामार्गावरील व राज्य मार्गावरील वळण मार्ग त्वरित दुरुस्त करून रहदारी सुरू करा एवढेच नव्हेतर खराब झालेले रस्ते व पूल बांधकामाचे एक्शन प्लॅन सादर करण्याचे निर्देश आणि त्यांना टाईमलाईन अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी संबंधित विभाला दिले.**

# पूरग्रस्त गावातील पाण्याचे स्रोत प्राधाण्याने स्वच्छ करा

## आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**गडचिरोली | प्रतिनिधी**

पुराचे पाणी ओसरल्यानंतर संबंधित पुरग्रस्त गावांमध्ये साथरोग पसरू नये म्हणून पाण्याचे स्रोत प्राधान्याने स्वच्छ करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी संजय दैने यांनी यंत्रणेला दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात २२ जुलै रोज सोमवारला आपत्ती व्यवस्थापन समितीचे बैठक घेण्यात आली यावेळी जिल्हाधिकारी संजय दैने यांनी जिल्ह्यातील परिस्थितीचा तालुकानिहाय आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह, पोलिस अधिक्षक श्री निलोत्पल, सहायक जिल्हाधिकारी राहुल मीना, निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सूर्यवंशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार, आपत्ती व्यवस्थापन सल्लागार कृष्णा रेड्डी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी निलेश तेलतुंबडे तसेच दूरदृष्य प्रणाली द्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, बांधकाम विभागाचे अधिकारी व आपत्ती व्यवस्थापन समितीचे सदस्य अधिकारी बैठकीला उपस्थित होते.जिल्हाधिकारी यांनी पुढे यांनी पुढे बोलताना सांगितले की पूर ओसरल्यावर मच्छर होऊ नये म्हणून गावागावात फवारणी करून घ्यावी. हॅण्डपंप, विहिरी आदी पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणे ब्लिचिंग टाकून विहिती पद्धतीने स्वच्छ करावी. रत्यावरील खड्डे बुजवून घ्यावे, विद्युतप्रवाह सुरळीत करणे, सध्या पावसाचा जोर कमी असला तरी नदी नाल्यांना पाण्याचा प्रवाह जोरात आहे, त्यामुळे पाणी वाहत असताना नदी नाला रपट्या वरून कोणालाही जाऊ देऊ नये व त्या ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवणे आदी सूचना त्यांनी दिल्या. अनेक ठिकाणी पूर पाहण्यासाठी नागरिक गर्दी करत आहेत यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी गर्दी टाळण्याचे आवाहन त्यांनी केले.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामीण रूग्णालयात खबरदारी म्हणून आगावू रक्तपिशव्या उपलब्ध करून ठेवण्याच्या सूचना दिल्या. यासाठी रक्तदात्यांकडून रक्तदान करून घेण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हा पोलीस अधिक्षक निलोत्पल यांनी पोलीस जवानांकडूनही रक्तदान उपलब्ध करता येईल असे सांगितले. पूर परिस्थितीमध्ये कोणत्याही मदतीसाठी रात्री अपरात्री पोलीस विभाग तयार असल्याचे सांगून सर्व यंत्रणेने आपसी समन्वय ठेवण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

# कोसरसार ते बोडखा (मो) रोडवर पडले खड्डे

## बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**वरोरा | प्रतिनिधी**



कोसरसार ते बोडखा (मो) या रोड ला मोठमोठाले खड्डे पडले आहे या रोडने तालुक्याच्या ठिकाणी बरेच शाळकरी मुले प्रवास करत असतात. कधी कधी पाणी जर जास्त झाले तर बोडखा या गावात जाणारी बस कोसरसार पर्यंत विद्यार्थ्यांना सोडून चालली जात असते. रस्ता दुरुस्त करण्यासाठी बांधकाम विभागाला निवेदने देण्यात आली परंतु या रोड चे काम अजून करण्यात आले नाही. याचा फटका शाळेतील विद्यार्थी रुग्ण याना बसतो जर या कडे प्रशासनाने लक्ष दिले नाही तर मोठे आंदोलन करण्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे तुषार बालखंडे, तन्वीर थाटे, आदर्श घेगारे, नामदेव थाठे, पावन बलखंडे यांनी दिला आहे .



पारडी गायमुख परिसरातील अनेक शेत पाण्याखाली असे आल्यामुळे शेतपिकाचे नुकसान झाले आहे.छाया :प्रणय बांगरे.

# राज्यात अनेक जिल्ह्यांत पाऊस;मुंबईत मुसळधार, विदर्भात रेड अलर्ट, कोल्हापुरात पंचगंगेला पूर

**मुंबई**–महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार पाऊस सुरू आहे. मुंबई, पुण्यासह कोकण आणि विदर्भात पावसाने सरासरी ओलांडली आहे. राज्यातील एकूण १७ जिल्ह्यांमध्ये सरासरी पाऊस झाला आहे. त्यातच आज सकाळपासूनच मुंबईमध्ये पाऊस सुरू झाला आहे. यामुळे अनेक ठिकाणी रस्ते जलमय झालेत. पावसाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता असल्यामुळे खबरदारी म्हणून शाळांना सुट्टी देण्यात आली आहे.



# गुरुजीला पडला पद जाण्याचा धाक,आठवीतील विद्यार्थ्यांना दाखविली खाजगी शाळेची वाट

## वरोरा तालुक्यातील वडधा (तुकूम) येथील प्रभारी मुख्याध्यापकाचा प्रताप

**वरोरा | प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील वडधा (तुकूम) येथे जिल्हापरिषदेची पहिले ते आठवी पर्यंत शाळा आहे .या शाळेत शैक्षणिक सत्र २०२४ -२५ करीत इयत्ता आठव्या वर्गात १४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता . शिक्षक कमी असल्याने वर्ग घेता येणार नाही असे म्हणत विद्यार्थी व पालकांना शाळेत बोलवून १४ ही विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखल देऊन दुसऱ्या खाजगी शाळेत प्रवेश करायला लावल्याचा प्रकार घडला असून संबंधित मुख्याध्यापकांवर कारवाई करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीने संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती ,वरोरा यांना निवेदन दिले आहे .



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा , वडधा (तुकूम) येथे शिक्षकांची संख्या रिक्त होती या रिक्त असणाऱ्या जागेवर १२ मार्च २०२४ ला सामाजिक शास्त्र विषयाच्या शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी काढले .ही रिक्त जागा भरली असतांना ही मुख्याध्यापक रमेश गोंगल यांनी २०२४ -२५ या शेक्षणिक वर्षाकरिता प्रवेशित १४ विद्यार्थ्यांना हेतुपरस्पर शाळा व्यवस्थापन समितीला विश्वासात न घेता शिक्षक रुजू होऊ नये या हेतून विद्यार्थ्यांना व पालकांना शाळेत बोलावून आपल्या पाल्यांना खाजगी शाळेत दाखल करा असा सल्ला दिला व १४ हि विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला देऊन आठवीचा वर्ग बंद केला . असा आरोप निवेदनातून शाळा व्यवस्थापन समितीने केला आहे . शाळेत रुजू होणारे सतीश डांगरे यांना मुख्याध्यापक पदाचा प्रभार न देणे तसेच त्यांची प्रतिनियुक्ती दुसऱ्या शाळेत होईल या उद्देशाने सदर प्रकार मुख्याध्यापक गोंगल यांनी केल्याचा आरोप व्यवस्थापन समितीने केला आहे .

त्याच सोबत गोंगल हे सहा शिक्षक असतांना ही त्यांच्याकडे मुख्याध्यापक पदाचा प्रभार देण्यात आला . तेव्हा पासून मुख्याध्यापक गोंगल यांनी प्रशासकीय नियमाला डावलून कार्यास सुरुवात केली आहे .शासकीय नियमानुसार २६ जूनला २०२३ शाळाव्यवस्थापन समितीची सभा संत्रारंभी घेण्याचे असतांना सुद्धा टी सभा त्यांनी १५ जुलैला २०२३ ला घेतली . त्या सभेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीला आर्थिक व्यवहाराचा हिशोब सादर न करता सभा संपविण्यात आली. २६ जानेवारी २०२४ नंतर शालेय पोषण संदर्भात शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या मदतनीस नियुक्तीकरिता शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेतली त्यामध्ये सुद्धा कोणत्याही प्रकारचा जमाखर्च संदर न करता सभा संपविण्यात आली . यानंतर शैक्षणिक सत्र २०२४ -२५ ची शासकीय नियमानुसार १ जुलैला सभा न घेता शाळा व्यवस्थापण समितीच्या आग्रहास्तव १३ जुलैला सभा घेण्यात आली . त्या सभे मध्ये ही आर्थिक व्यवहाराबाबत मुख्याध्यापकांनी कोणतीही माहिती दिली नाही त्यामुळे यात आर्थिक घोटाळा झाला असावा असा आरोप शाळा व्यवस्थापन समितीने केला आहे .असे अनेक प्रकार शाळेत सुरु असून मुख्याध्यापकांनी पैसाची परस्पर उचलही केली आहे . एकंदरीत सदर मुख्याध्यपक जे शासकीय नियुक्तीच्या नियमावलीप्रमाणे पूर्णतः कार्यवाहीस पात्र असून शाळा व्यवस्थापन समितीच्या अर्जाचा विचार करून या प्रकारची चौकशी करून सदर शिक्षकाला दुसऱ्या शाळेत नियुक्त करावे व शाळेत नवीन दोन शिक्षकांची नियुक्ती करावी अन्यथा शाळा व्यवस्थापन समिती शाळेला कुलूप लावून शाळा बंद करेल असा इशारा ही निवेदनातून देण्यात आला . शाळा व्यवस्थापन समिती तर्फे संवर्ग विकास अधिकारी वरोरा यांना देण्यात आले. या निवेदनाची दखल घेऊन संवर्ग विकास अधिकारी व पंचायत समिती वरोरा चे शिक्षण विभागाचे अधिकारी त्या शिक्षकावर काय कारवाई करते या कडे गावकऱ्यांचे लक्ष लागून आहे .

### गुरुजी म्हणतात गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मला कारकुनाची कार्य करायला नियुक्त केले.

शैक्षणिक सत्र २२०२३ -२४ चा शैक्षणिक वर्षात प्रभारी मुख्याध्यापक गोंगल यांच्या कडे वर्ग १ ते ३ स्वमर्जीने घेऊन संपूर्ण शैक्षणिक सत्रात कोणत्याही वर्गात अध्यपान केले नाही . या सोनेगाव येथील एका महिला पालकाने मुख्याध्यपकाला आपण वर्गात मुलांना शिकवीत नसतात या बाबत विचारणा केली असता . गटशिक्षण अधिकारी वरोरा यांनी मला फक्त आणि फक्त कारकुनाची कार्य करायला नियुक्त केले आहे असे उडवाउडवीची उत्तर पालकांना देण्यात आले .

### खाजगी शाळेकडून मिळाली गुरुजींना दक्षिणा

खाजगी शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी गुरुजींनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्या खाजगी शाळेत पाठविले असून त्यासाठी गुरुजींना या खाजगी शाळेकडून दक्षिणा मिळाली असल्याची खमंग चर्चा गावात रंगली आहे .

### गुरुजींना पडला पद जाण्याचा धाक

गावात जिल्हा परिषदेची १ ते ८ पर्यटन शाळा असून या शाळेत मुख्याध्यापक हे प्रभारी आहे . ८ व्या वर्ग करिता नवीन शिक्षक येईल ते पदवीधर किंवा सिनियर असेल या भीतीने आपल्याकडे असणारा मुख्याध्यापक पदाचा प्रभार काढून त्यांना देण्यात येईल या भीतीने गुरुजींनी आठवा वर्ग बंद तर केला नसावा ना अशा चर्चेला उधाण आले आहे .

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यानेच केली घाण;घरचा मलबा आणून टाकला शाळेच्या पटांगणात

## सरपंच्याचे कुणी ऐकेना ; गटविकास अधिकाऱ्याचे कानावर हात

**झडशी । प्रतिनिधी**

सेलू पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या झडशी केंद्रातील हिवरा (अंतरगाव) या शाळेतील प्रागणात ग्रामपंचायत मध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या कर्मचाऱ्याने आपल्या घरचा मलबा आणून टाकला. हा कचरा हटवून शाळेतील मुलांना स्वच्छतेचा परिपाठ देण्यासाठी शाळा समिती अध्यक्ष व मुख्याद्यापकाची पायपीठ सुरु असून प्रशासन हतबल झाले आहे.तर सरपंच्याचे कुणी एकायला तयार नाही . गटविकास अधिकारी तक्रार घ्यायला तयार नाही. त्यामुळे शाळकरी मुलांना अस्वच्छ परिसरातच आपले शिक्षणाचे परिपाठ पूर्णकरावे लागत आहे .

सविस्तर वृत्तांत असा की, हिवरा हे गाव अंतरगाव ग्राम पंचायत क्षेत्रात येत असून या ठिकाणी जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे.

या ठिकाणी १ ते ४ वर्गभरतात. शाळेला प्रशस्तपटागण असून या ठिकाणी गावात पाणीपुरवठ्याचे काम करणाऱ्या इसमाने आपल्या घराच्या बांधकामातील वेस्ट मटेरियल आणून टाकले. आणि परिसरात घाण निर्माण केली. पावसाचे दिवस असल्याने शालेय परिसर स्वच्छ असणे अपेक्षित आहे. अस्वच्छता करणारा ग्राम पंचायतचा माणूस असल्याने ही समस्या निकाली निघण्यास वेळ लागणार नाही, अशी अपेक्षा असताना हा कचरा साफ करण्यास शिक्षण समितीचे अध्यक्ष अतुल बांते यांचा कस पणाला लागला आहे. हा कर्मचारी सरपंचांला ऐकत नाही. आणि गट विकास अधिकाऱ्याकडे जावे तर बाहेरूनच हाकलून लावतात, असा आरोप बांते यांनी केला आहे.



**“ ग्राम पंचायत अंतरगाव येथे पाणी पुरवठा कर्मचारी वेगळाच आहे, परंतु त्या बदल्यात काम वेगळाच करतो. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. त्यांनी मलमा हटविण्यासाठी पंधरा दिवसापूर्वी सरपंच्यानी केलेल्या सूचनेची अवहेलना केली आहे. आणि वाद निर्माण केला. उचित कारवाई करावी अशी मागणी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अतुल बांते यांनी केली आहे**

**याबाबत अंतरगाव येथील सरपंच कीर्ती शंभरकर यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, हिवरा शाळेतील मटेरियल हटविण्या संदर्भात मी स्वछता कर्मचाऱ्याला पंधरा दिवसांपूर्वीच सांगितले होते. परंतू त्यांनी ते हटविले नसावे , परत मी एकदा सांगते.**

**याबाबत गट विकास अधिकारी पानबुडे यांना विचारणा केलीअसता त्यांनी सांगितले की, हा प्रश्न ग्राम पंचायत स्तरावरील आहे. ऑन लाईन कामामुळे मी त्रस्त झालो आहे. काय करावे आणि काय नको करावे असे झाले आहे. हा विषय मी उद्या बघतो.**

# अमित शहा यांनी शरद पवार यांच्यावर केलेले वक्तव्य निषेधार्य

## मागे वळून पाहिले तर, चोरांना प्रत्येक जण चोरच वाटतो–धुन्नाजी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अमित शहा बद्दल सर्वसामान्यांच्या मनात कसलीही चांगली भावना नव्हती असं असलं तरी पण जेव्हा चिडलेले मांजर खांबाला जोरजोरात ओरबाडते, तेव्हा समजले पाहिजे की त्याच्यात नैराश्य भरले आहे. आणि अशा नैराश्यातून जेव्हा त्यांचा तोल बिघडतो तेव्हा असे लोक अपयश लक्षात घेऊन काहीही बोलू लागतात. ते इतरांमध्येही स्वतः प्रमाणे वाईट पाहू आणि विचार करू लागतात. शाह ज्यांचे चित्रण इतिहासाच्या पानांवर सामान्य लोकांमध्ये एक महान भ्रष्टव्यक्ती म्हणून केले जाते. शहा यांचे हे वक्तव्य ऐकून महाराष्ट्रातील जनता अशा भावना व्यक्त करत आहे. अमित शहा यांना महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा, अस्मिता आणि त्याग समजला नाही. आणि



संस्कारांच्या अभावामुळेच महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेत्याबद्दल म्हणजे मुंह में आया सो बक दिया,...... या म्हणीला अनुसरून अशी मूर्ख विधाने केली जातात. आपला गृहमंत्री इतका अडाणी आणि मूर्ख कसा आहे याची आपल्याला लाज वाटते. एक म्हण आहे की, सावन महिन्यात आंधळ्याला सर्वत्र हिरवळ दिसते. ही व्यक्ती खरच राष्ट्रीय स्वयं सेवक संघ मध्ये किंवा त्याच्या संपर्कात कधी आले असावेत किंवा कधी सामील झाली होती का अशी शंका आहे. जर झाले असते तर अमित शहांच्या तोंडून आपल्या देशाच्या जबाबदार व्यक्तीबद्दल असभ्य शब्द निघाले नसते. या शब्दात महाराष्ट्र जन अधिकार सन्मान रक्षा संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी सरदार हरविंदरसिंग धुन्नाजी यांच्या उपस्थितीत तीव्र निषेधाचा ठराव संमत करून भारताचे राष्ट्रपती व पंतप्रधान यांना निषेधाचे पत्र पाठवले आहे.

## जनसेवा हिच ईश्वर सेवा : महेश मेंढे

# पावसामुळे जनजीवन विस्कळीत गरजूंना मसाला भाताचे वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर मध्ये सतत सुरू असणाऱ्या पावसामुळे चंद्रपूर मधील काही भागांमध्ये आंबेडकर नगर ,रमाई नगर अष्टभुजा ,हिंगलाज भवानी,टॉवर टेकडी ,लुंबिनी नगर आणि बाबूपेठ मधे नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरल्यामुळे त्यांना अवंती - अंबर सामाजिक प्रतिष्ठान, चंद्रपूरचे अध्यक्ष काँग्रेसचे नेते महेश मेंढे यांच्यातर्फे पूरी-भाजी,मसाला भातचे पॅकेज वाटप करण्यात आले.



चंद्रपूर जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाने घरातील वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मुसळधार पावसामुळे तीन दिवंसापासून जिल्ह्यांत अनेक ठिकाणी पावसाने हाहाकार घातला आहे. अनेक गावांमध्ये पुरसदृष्य स्थिती निर्माण झाली. तर अनेक गावांचा संपर्क तुटला. अश्यात चंद्रपूर येथील अष्टभुजा वाड़ , रमाई नगर , टॉवर टेकडी, लुंबिनी नगर , बाबूपेठ, सिद्धार्थ नगर, आंबेडकर वार्ड, हिंगलाज भवानी वार्ड परिसरात रात पाणी गेल्याने जनजीवन विस्कळले आहे.याचे मदतीसाठी जनसेवा हिच ईश्वर सेवा हे व्रत हाती घेतलेले अवंती - अंबर सामाजिक प्रतिष्ठान, चंद्रपूरचे अध्यक्ष काँग्रेसचे नेते महेश मेंढे यांनी पाहणी करुन गरजुंना छतासाठी ताळपत्रीचे वाटप करत असून काहींना त्यांनी पूरी-भाजी,मसाला भातचे पॅकेज वाटप करून अनेकांना सहारा दिला आहे. पुरपीडित असो व गरजू न्याचे मदतीसाठी आपण सदैव मदतीसाठी तयार असल्याचेही ते म्हणाले. यावेळी अविनाश मेश्राम ,सचिन रणवीर, समीर सोनवणे, अथर्व फुलझेले, सर्वेश पिसे, मीनल गुरव , राजेश पिंपळकर , विनय देठे, पियुष धुपे यांनी अष्टभुजा वाड़ , रमाई नगर , टॉवर टेकडी, लुंबिनी नगर , बाबूपेठ, सिद्धार्थ नगर, आंबेडकर वार्ड, हिंगलाज भवानी वार्ड येथील गरजूना मसाला भाताचे वाटप केले.

# नैसर्गिक आपत्तीतील मृतांच्या वारसांना तहसीलदार हेमंत गांगुर्डे यांच्या प्रयत्नांनी तात्काळ मदत



**अहेरी । प्रतिनिधी**

उपविभागातील एटापल्ली तालुक्यात जुलै महिन्यात नैसर्गिक आपत्तीत मृत पावलेल्या तीन जणांच्या वारसांना तब्बल १२ लाखांची मदत देण्यात आली. येथील तहसीलदार हेमंत गांगुर्डे यांच्या विशेष प्रयत्नातून तात्काळ याच महिण्यात मदत मिळाली आहे. तिन्ही मृतांच्या वारसांना अहेरीचे अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांच्या हस्ते धनादेश वितरित करण्यात आले.

नैसर्गिक आपत्तीत बाधित झालेल्यांना व मृतांच्या वारसांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात येत असते.जुलै महिन्यात एटापल्ली तालुक्यात तीन विविध घटना घडल्या.त्यात २ जुलै २०२४ रोजी अमित डोलू तिम्मा रा. तोडसा हा पुराच्या पाण्यात वाहून गेला होता.तर चंदू गिरमा पोरतेट रा.जिवनगट्टा याचा वीज पडून मृत्यू झाला होता.तर ८ जुलै रोजी अंकुश पांडू कुळयेटी रा.मरपल्ली याचा नाल्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला होता.नैसर्गिक आपत्तीत मृत पावलेल्या इसमांच्या वारसांना तात्काळ शासनाची मदत मिळावी या उदात्त हेतूने येथील तहसीलदार हेमंत गांगुर्डे यांनी विशेष प्रयत्न केले. विशेष म्हणजे तिन्ही घटना जुलै महिन्यात घडल्या असून याच जुलै महिन्यात त्यांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत देण्यात आली.२२ जुलै रोजी तोडसा, जीवनगट्टा, मरपल्ली या तिन्ही गावात मृतांच्या वारसांची भेट घेऊन अहेरीचे अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी प्रत्येकी चार लाखांचे धनादेश वितरित केले.यावेळी तहसीलदार हेमंत गांगुर्डे गटविकास अधिकारी डॉ.आदिनाथ आंधळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सचिन कन्नाके, पंचायत समितीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी मडावी,तलाठी पी एन उसेंडी,पी डी आत्राम,कोतवाल देवाजी गावडे,सुरेश दुर्गे,सचिन गेडाम आधी गावकरी उपस्थित होते.

# वालचंद विद्यालय व जुनिअर कॉलेज कळंब येथे गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन




**इंदापूर । प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमेनिमित्त कळंब ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित वालचंद विद्यालय येथे गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी प्रसंगी ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामचंद्र कदम , कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते पी पी पोळ , कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विद्यालयाचे प्राचार्य सर्वगोड , जेष्ठ शिक्षक अर्जुन उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.पी गायकवाड यांनी केले, तर प्रस्ताविक ज्युनिअर विभाग प्रमुख सावंत एसटी यांनी केली, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सागर पवार यांनी केले , कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते पोळ यांनी विद्यार्थ्यांना, शिष्याची गुरु विषयी असणारी निष्ठा, श्रद्धा, व्यवहारिक उदाहरणातून दाखले देण्याचा प्रयत्न केला, स्वामी विवेकानंद व रामकृष्ण परमहंस यांचा गुरु शिष्याचं नातं, एखाद्या राजाला सुद्धा गुरूंचा सल्ला संकट समय कसा महत्त्वाचा ठरतो याचं उदाहरण, त्याचबरोबर विद्यालयाचे प्राचार्य यांनी एकलव्य द्रोणाचार्य, श्रीकृष्ण अर्जुन, आचार्य चाणक्य आणि चंद्रगुप्त मौर्य, यांविषयी गुरु शिष्य च नातं कसे महत्त्वाचे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले, तसेच ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामचंद्र कदम, यांनी आजच्या विद्यार्थ्यासाठी गुरु आणि शिष्य किती महत्त्वाचा आहे, तसेच विद्यार्थ्यांनी गुरु विषयी निष्ठा बाळगली पाहिजे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# पूरबाधित गावातील नागरिकांच्या अडचणी त्वरीत सोडवा;जिल्हाधिकाऱ्यांचे शासकीय यंत्रणेला निर्देश

## जिल्ह्यात ७७८ गावे बाधित; ११२२९ हेक्टरवर नुकसानीचा प्राथमिक अंदाज

### आरोग्य विभाग

**पूरबाधित गावांमध्ये साथरोग पसरणार नाही, यासाठी आरोग्य विभागाने विशेष काळजी घ्यावी. तालुका आरोग्य अधिका–यांनी पूरबाधित गावांना भेटी देऊन विशेष शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करून घ्यावी.**

### पाणी पुरवठा विभाग

**पूरबाधित गावांमध्ये पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता तसेच शाखा अभियंत्यांनी भेट देऊन पाणी टाकी दुरुस्ती, बोअरवेल दुरुस्ती करून घ्यावी. तसेच नागरिकांना दुषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणार नाही, याची काळजी घ्यावी. पाण्याचे क्लोरीनेशन करावे.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गत दोन दिवसात चंद्रपूर जिल्ह्याला पावसाचा चांगलाच तडाखा बसला आहे. प्रादेशिक हवामान खात्याने अजूनही जिल्ह्याला अतिवृष्टी व सतर्कतेचा इशारा दिला आहे. जिल्हा प्रशासन पूर पीडितांच्या मदतीसाठी तत्पर असून तालुका व गावस्तरावरील शासकीय यंत्रणेने पूरबाधित गावांना भेटी देऊन नागरिकांच्या अडचणी तात्काळ सोडवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी सोमवारी दिले.

जिल्ह्यातील पूरपरिस्थतीचा आढावा घेण्यासाठी वीस कलमी सभागृह येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, कार्यकारी अभियंता सुनील कुंभे, मुकेश टांगले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव



चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अजूनही काही रस्त्यांवर पुराचे पाणी वाहत आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, अशा रस्त्यावर वाहनांना तसेच नागरिकांना वाहतुकीस प्रतिबंध करावा. त्यासाठी आवश्यक बॅरेकेटींग करावी. पुराच्या पाण्यामुळे कोणतीही जिवीतहानी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील खालच्या यंत्रणेला निर्देश द्यावे. तसेच क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागाने किंवा जि.प.बांधकाम विभागाने डागडुजी करावी.

### कृषी विभाग :

**प्राथमिक अंदाजानुसार पावसामुळे जिल्ह्यातील ७७८ गावे बाधित तर ११२२९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतमालाचे युध्दपातळीवर पंचनामे करा. कृषी सहायक, ग्रामसेवक, तसेच गावस्तरावरील सर्व यंत्रणांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे करावे. तसेच जिओटॅगिंचे फोटो काढावेत.**

### अधिकारी – कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहावे

**स्थानिक परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या मुख्यालयी राहावे. याबाबतच्या सुचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व विभागांना तातडीने द्या. तसेच ज्या गांवाना पुराचा तडाखा बसला आहे, तेथे तालुकास्तरीय सर्व विभागाच्या शासकीय यंत्रणेने पोहचून पूरपिडीतांच्या समस्या सोडवाव्यात.**

# सेलू नगरपंचायतचा अजब कारभार ;ऐन पावसाळ्यात खोदकाम

## रस्ता चिखलमय झाल्याने नागरिकांना होतोय त्रास

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू शहरात पावसाळा सुरू होण्या अगोदर पाणी पुरवठा योजनेच्या कामाला सुरूवात झाली हे काम पावसाळ्यातही सुरू असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.सेलू शहरातील प्रभाग ६ मध्ये पाणी पुरवठा योजनेच्या ठेकेदाराने रस्त्याच्या कडेला तर काही ठिकाणी रस्ता फोडून नाली खोदली त्यात पाईप टाकले पण या पाईपावर माती टाकली सततच्या पावसाने सिमेंट रस्ते चिखलाने माखले त्यामुळे दुचाकी वाहन धारकांना वाहन चालवितांना तारेवरची कसरत करावी लागते अनेक वाहन धारकांना घसरून पडण्याची वेळ आली तर काहींना किरकोळ इजा झाली तरी नगर पंचायत मृग गिळून बसल्याचे नागरिक बोलत आहे. या रस्त्याने चार चाकी वाहन खोदलेल्या नालीत फसल्याने जे सी बी चे साहाय्याने काढण्याची वेळ आली आहे त्या मुळे पावसाळ्याच्या दिवसात मातीकाम करणारे पहिले प्रशासन असल्याची चर्चा जोर धरत आहे.



पावसाळ्याच्या दिवसात चांगले रस्ते फोडून पाणी पुरवठा योजनेच्या कामाला जोरात वेग आला आहे या मागचे नेमके कारण काय असा प्रश्न निर्माण झाला आहे.पण यामुळे नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे याला जबाबदार कोण तर नाली भरताना मुरुमाचा वापर करण्यात आला नाही तर मातीचा वापर करण्यात आल्याने चिखलमय परिस्थिती निर्माण झाली आहे.

> **“ जे काम हिवाळा व उन्हाळ्यात करायला पाहिजे ते काम पावसाळ्यात होत असून नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे या बाबत नगर पंचायत पदाधिकाऱ्यांना याचीमहिती दिली पण या कडे लक्ष देण्यास कोणीही तयार नाही त्यामुळे रस्त्याने जावे कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे.**
>
> **हिम्मत अली शहा, माजी नगरसेवक नगर पंचायत सेलू**

# कृषीकन्यांचे बोर्डो मिश्रण तयार करण्यासंदर्भात मार्गदर्शन




**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा येशील अंतीम वर्षातील विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम या अंतर्गत तालुक्यातील सालोरी या ठिकाणी शेतीशी निगडित विविध उपक्रम राबवले जातात.

त्याचप्रमाणे सालोरी येथील कृषीकन्यांनी बोर्डो मिश्रण तयार करण्यासंदर्भात सालोरी येथील शेतकऱ्यांचे मार्गदर्शन केले.गावात घेतली जाणारी विविध भाजीपाला पिके त्यानंतर फळबाग, फुलबाग यामध्ये आढळणारी बुरशी आणि त्यामूळे शेतकयांच्या उत्पन्नात होणारी घट यावर उत्तम उपाय म्हणजे बोर्डो मिश्रण. हे एक बुरशीनाशक म्हणून कार्य करते . बोर्डो मिश्रण फक्त बुरशीवरच नाही तर कोळशी, करपा, ठिपके यांसारख्या रोगांवरसुद्धा नियंत्रण ठेवतो. याशिवाय विद्यार्थिनींनी बोर्डो मिश्रण तयार करण्याची पद्धत, बोर्डो मिश्रणाचा वापर, त्याची घेतली जाणारी काळजी व ते फवारण्याची योग्य वेळ या संदर्भात शेतकऱ्यांचे मार्गदर्शन केले.


आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ. आर. वी महाजन, कार्यक्रम समन्वयक आर.वी. तायडे व विषय विशेषज्ञ डॉ. एम. जी. जोगी यांचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यक्रमात मिनल खिरटकर, रुचिता कुंभारे, पुनम लुचे, मिताली झाडे, निकिता लाहोरे वैष्णवी कोरडे ,तनया महल्ले यांचा समावेश असुन इतर शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

# मांडगांव-समुद्रपुर मार्गावर 3 तास वाहतूकीचा खोळंबा

## वाघाडी पुलावर २ ते ३ फुट पाणी

**मांडगांव । वार्ताहर**

तिन दिवसांपासून वर्धा जिल्ह्यातील परिसरातील भागात पावसाने आपली कृपादृष्टी दाखवण्यात सुरुवात केली असून मांडगांव परिसरात देखील मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने नदी , नाले ओसांडून वाहत असल्याने आजही २२ जुलै रोज सोमवारला सकाळी ९ ते १ पर्यंत वाघाडी पुलावर पाणी असल्याने मांडगांव व समुद्रपुर रोडवरील वाहतूकीस ३ ते ४ तास खोळंबा निर्माण झाला होता .



२१ जुलै रोजी रात्री पावसाने चांगलेच झोडपून काढले असून तिन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी पुलावर पाणी असल्याने अनेक ठिकाणांचे मार्गावर पाणी असल्याने वाहतूक बंद होती . मात्र पावसाळ्यात रोहनी नक्षत्र , मृग नक्षत्र , आद्रा नक्षत्र , मोठा पुक नक्षत्र ह्या नक्षत्रात पावसाने थोडेफार पाऊस येवून शेतकऱ्यांचे कापूस व सोयाबीन पिकाची लागवड करून शेती हिरवेगार फुलवु लागली होती . परंतु शेतामध्ये पाणी थोडे फार ही पाणी नव्हते आणि शेवटी मोठ्या पुकाच्या नक्षत्रात लहान पुक नक्षत्राच्या जोडावर लाडक्या पुक नक्षत्राने पावसाने आपली कृपादृष्टी दाखवण्यात सुरुवात करण्यात आली असून १९ , २० ,२१ आणि २२ ला ही सकाळी पाऊस सारखाच सुरू होता. त्या मुळे बोर नदी ,धाम नदी , वणा नदी ही दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या ह्या फुलुन शांतपणे आपला प्रवाह सुरू असताना छोटे मोठे नाले हे ही ओसंडून वाहत असल्याने रोड , रस्त्यावर असलेल्या पावसामुळे पुलावर पाणी असल्याने वाहतूकही खोळंबली होती . आज तिसऱ्या दिवशी ही मांडगांव - समुद्रपुर रोडवरील वाघाडी पुलावर पाणी असल्याने सकाळी ९ ते १ पर्यंत ह्या रोडवरील वाहतूक बंद झाली होती . त्यामुळे सकाळी जाणाऱ्याविद्यार्थी , सुतगीरणी मध्ये जाणारे मंजूर वर्ग यांना आल्या पावली घरीच परतावे लागले होते . नंतर १ वाजेपासून वाहतूक सुरळीत चालू झाली आहे .

# स्मशानभूमीसाठी आपची पंचायत समिति कार्यालयावर प्रतिकात्मक शवयात्रा

## गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर

**भद्रावती । प्रतिनिधी**

शहरालगत असलेल्या लोणारा गावात स्मशानभूमीच नसल्यामुळे येथील गावकऱ्यांना नाईलाजाने हायवेच्या कडेला प्रेतावरील अंत्यविधी पार पाडावा लागत आहे . येथील स्मशानभूमी करिता २०१४ ला जागा उपलब्ध करून देण्यात आली. मात्र ग्रामपंचायतीतर्फे येथे स्मशानभूमीचे काम अद्याप पर्यंत करण्यात आले नाही. या गंभीर समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्याकरिता भद्रावती आम आदमी पक्षातर्फे २२ जुलै रोज सोमवारला सुरज शहा आम आदमी पार्टी जिल्हा उपाध्यक्ष यांचे नेतृत्वात शहरातील गांधी चौकातून पंचायत समिती कार्यालयावर पुतळ्याची प्रतीकात्मक शवयात्रा काढण्यात आली व गटविकास अधिकाऱ्यांना या संदर्भात निवेदन देण्यात आले .




स्मशानभूमी बांधकामा संदर्भात लोणारा ग्रामपंचायतीकडून आपल्या कार्यालयाला आजपर्यंत कोणताही प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याचे यावेळी गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ यांनी आंदोलनकर्त्यांना सांगितले. या संदर्भात कार्यालयाला प्रस्ताव प्राप्त झाल्यास यासंदर्भात असलेली लोणारा गावकऱ्यांची समस्या निकालात काढण्यात येईल असे आश्वासनही यावेळी गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ यांनी सदर आंदोलनकर्यांना दिले.यावेळी युवा जिल्हा उपाध्यक्ष सुमित हस्तक, जिल्हा उपाध्यक्ष नागेश्वर गंडलेवार, जिल्हा संघटन मंत्री भीमराज सोनी, भद्रावती शहर अध्यक्ष अनिल कुमार राम, जिल्हा कोषाध्यक्ष सरफराज शेख, शेतकरी आघाडीचे अध्यक्ष दीपक बारशेट्टीवार, महानगर महिला अध्यक्ष . तब्बसूम शेख, आसिफ हुसेन शेख, रोहन गाज्जेवार, अनुप तेलतुंबडे, मीडिया प्रभारी प्रशांत रामटेके, सॅम्युअल गंधम, राजकुमार चट्टे, सुरज खंगार, अमित कसारे, सतिष कुथे, वैभव तंकाडे, शुभम गंडलेवार, सुनील खोंडे, अविनाश निखाडे, विजय आत्राम, मनोज पारखी, लक्ष्मण देवतळे, स्वप्निल पारखी, दिनेश गोचे, विजय राजूरकर, केतन पारखी, शंकर गोचे, कार्तिक नागपुरे, गोकुळ गोचे, सुरज वासेकर, मनीष पारखी, स्वप्निल ढुमणे, रवींद्र सोयाम, श्रीकांत पायपरे, सचिन डाहुले, आकाश आत्राम, प्रतीक पायपरे, निखिल गोचे, विवेक पिंपळे, प्रवीण राजूरकर, आविश पारखी, समस्त पदाधिकारी, कार्यकर्ते व गावकरी उपस्थित होते.

# गडचिरोलीतील ३३ मार्ग अजूनही बंदच,मंगळ वारी २३ जुलैला शाळा, महाविद्यालयांना सुट्टी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यात आज पावसाने थोडी विश्रांती घेतल्यानंतर दुपारपासून पुन्हा पावसाची रिपरिप सुरुच आहे. भामरागडनजीकच्या पर्लकोटा नदीचा पूर ओसरला असून, तेथील जनजीवन पूर्वपदावर येत आहे. गोसेखुर्द धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग वाढवून तो ३ लाख ५४ हजार क्यूसेक्स करण्यात आला आहे. ३३ मार्गावरील वाहतूक अजूनही ठप्पच आहे. पूर परिस्थिती बघता जिल्हाधिकाऱ्यांनी मंगळवारी २३ जुलैला शाळा आणि महाविद्यालयांना सुटी जाहीर केली आहे.दोन दिवस पडलेला मुसळधार पाऊस आणि धरणातील पाण्यामुळे नदी, नाल्यांना पूर आला असून, गडचिरोली-आरमोरी, आलापल्ली-ताडगाव, भामरागड- एटापल्ली, आलापल्ली-सिरोंचा, आष्टी-आलापल्ली या प्रमुख मार्गासह ३३ मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. यामुळे शेकडो गावांचा संपर्क अद्यापही तुटलेलाच आहे.मागील २४ तासांत कुरखेडा तालुक्यात सर्वाधिक १४४ मिलिमीटर पाऊस पडला. त्याखालोखाल देसाईगंज तालुक्यात ११७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. गडचिरोली तालुक्यातील कोटगल बॅरेजच्या कामावरील ७० कामगारांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे, तर पारडी येथील १९ जणांना गावातच स्थलांतरीत करण्यात आले आहे.काल रात्री ९ वाजताच्या सुमारास भर पावसात मुलचेरा-आलापल्ली मार्गावरुन मोटारसायकलने प्रवास करताना नवीनकुमार रेड्डी नामक व्यक्तीचा झाडाला धडक दिल्याने मृत्यू झाला. अतिवृष्टीमुळे १२ घरांचे अंशतः नुकसान झाले, तर एक गोठा पूर्णतः क्षतिग्रस्त झाला आहे.

# अतिप्रभावित मेगा पाणलोट प्रकल्प अंतर्गत सहभागी ग्रामीण मूल्यांकन सपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्याच्या अतिदुर्गम भागातील २५ ग्रामपंचायत मध्ये भारत रुलर लाईलिहूड फाऊंडेशन व कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने अति प्रभावीत मेगा पाणलोट प्रकल्प राबवण्यात येत आहे,त्यानुषगाने दिनांक २२जुलैला ग्रामपंचायत वायगाव भोयर, सालोरी व दिंडोळा येथे सहभागी ग्रामीण मूल्यांकन घेण्यात आले.



जि. आय. एस.आधारित सविस्तर प्रकल्प आराखडा पाणलोट एकूण भौगोलिक क्षेत्र निश्चित केले असून सध्या निवळ केलेल्याला पाणलोट क्षेत्र मध्ये जि. आय. एस. आधारित सविस्तर कृति आराखडा तयार करण्या करिता सहभागी ग्रामीण मूल्यांकन च्या माध्यमातून शिवार फेरी करणे, शेतकरी निवळ करणे, विविध योजना बाबत माहिती देऊन ते लाभार्थी पर्यंत पोहचवणे या आधारे पाणलोटाची कामे निवळ करून ती त्या स्तरावर राबवणे या प्रकल्प अंतर्गत माथा ते पायथा जलसंधरनाची कामे करून पाण्याचा स्तर वाढण्यात येणार आहे. त्याच बरोबर मनरेगा अंतर्गत कामांना गती देऊन सीमांत कुटूंब यांचे उत्पन्न वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणार आहेत व उपजीविका यावर भर देण्यात येत आहे. पर्यावरणासी आपल्याला कसे जुळून राहता येईल व याचाच एक भाग म्हणून सहभागी ग्रामीण मूल्यकण करून त्या गावचा कृति आराखडा बनवून तो राबवण्यात येणार आहे, या करिता सर्व गावातील सरपंच ग्रामस्थ,ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य,महिला बचत गट व ग्रामरोजगार सेवक उपस्थित होते.त्याच बरोबर कृषी विकास संस्था चे टीम लीडर रोशन मानकर,कृषी तज्ञ प्रबुद्ध डोये तालूका समन्वयक दिक्षानंद राऊत, निकलेश चौधरी , साधन व्यक्ती मंगेश तुमसरे,विशाल आडे ,गुरूदास चौधरी,आचल घोडमारे,पल्लवी नन्नावरे,नीलिमा वनकर,माया पोहीणकर उपस्थित होते.

# जिल्ह्यातील १ लक्ष २३ हजार ९३६ महिलांनी भरले मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म

## अर्ज स्वीकारण्यासाठी एकूण ३९०१ मदत केंद्र कार्यान्वित

### जिल्ह्यातील मदत केंद्राची संख्या :

**जिल्ह्यातील तीन शहरी व १५ ग्रामीण अंगणवाडी प्रकल्पामध्ये एकूण २९६२ मदत केंद्र, ग्रा.पं.स्तरावर ८२५ केंद्र, चंद्रपूर महानगर पालिका स्तरावर ३६, नगरपालिका / नगर पंचायत स्तरावर ५१ आणि सेतू केंद्रस्तरावर २७ असे एकूण ३९०१ मदत केंद्र आहे.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये ‘मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण योजने’ची प्रभावी अंमलबजावणी होत असून या योजनेचे अर्ज स्वीकारण्यासाठी जिल्ह्यात एकूण ३९०१ मदत केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहेत. या केंद्राच्या माध्यमातून २० जुलैपर्यंत १ लक्ष २३ हजार ९३६ महिलांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांचे आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे, तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भुमिका मजबूत करण्यासाठी शासनाने ‘मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना’ सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिला / मुलींना दरमहा १५०० रुपये देण्यात येणार आहे. अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत आहे.



### अशी आहे प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या

**जिल्ह्यात आतापर्यंत ऑफलाइन पद्धतीने ५८२३१ तर ऑनलाईन पद्धतीने ६५७०५ असे एकूण १ लक्ष २३ हजार ९३६ अर्ज प्राप्त झाले आहेत. यात जिल्ह्यातील ३ शहरी अंगणवाडी आणि १५ ग्रामीण अंगणवाडी प्रकल्पामध्ये ऑफलाईन ५४७२८, ऑनलाईन ६३४६० असे एकूण १ लक्ष १८ हजार १८८ अर्ज, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या सुविधा केंद्रात ऑफलाईन २६५२, ऑनलाईन १०९७ एकूण ३७४९ अर्ज, जिल्ह्यातील नगरपालिका , नगरपंचायत क्षेत्रात असलेल्या सुविधा केंद्रात ऑफलाईन ४३८, ऑनलाईन ६७८ एकूण १११६ अर्ज तर जिल्ह्यातील विविध सेतू केंद्रामध्ये ऑफलाईन ४१३, ऑनलाईन ४७० एकूण ८८३ अर्ज प्राप्त झाले आहेत.**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .